# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १२/१०/२०२६ (सोमवार )

---

## खुनाच्या गुन्हयातील आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली सदोष मनुष्यवधाची शिक्षा

**पोलीस स्टेशन काटोल** :— फिर्यादी मोहन शंकर वाईदेशकर, रा. फैलपुरा, काटोल यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे अप. क्र. १४४९/२०२५ कलम ३०२ भादवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

**सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, यातील फिर्यादीचे वडील मृतक नामे शंकर झोलबाजी वाईदेशकर,वय ७६ वर्षे,रा फैलपुरा, काटोल हे दिनांक १७/१२/२०२३ रोजी जैस्वाल यांच्या देशी दारूच्या दुकानात गेले असता त्यांनी आरोपी महेश प्रभाकर अनासने,वय ५१ वर्षे, खरकाडीपुरा ,अमरावती ह.मु. फैलपुरा काटोल याला शेंगदाने मागितले त्याने शेंगदाणे देण्यास नकार दिल्याने त्यांच्यात वाद झाला. सदर वादामुळे आरोपी याने मृतक यांचा चाकुने भोकसुन खुन केला.**

**तपासी अधिकारी श्री परमेश्वर आगासे, पोलीस उपनिरीक्षक, काटोल यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक १२/१०/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश ०५ श्री व्ही. एम . पथाडे यांनी नमुद आरोपी महेश प्रभाकर अनासने यास भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४ (भाग—२) अन्वये दोषी ठरवुन ७ वर्षे सश्रम कारावास व १०,०००/— रूपये दंड , दंड न भरल्यास ०२ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री दिपक गादेवार काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, पोलीस

निरीक्षक श्री रणजित शिरसाठ ,प्रभारी अधिकारी,पोलीस स्टेशन काटोल, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा. पोलीस निरीक्षक श्री विशांत नांदगाये, पोहवा गणेश भुरे, ब.नं १५८२, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण तसेच पोहवा बाबा नेवारे ब.नं ८२,पैरवी अधिकारी, काटोल पोलीस स्टेशन यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

## अल्पवयीन बालीकेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन रामटेक** :– फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन रामटेक येथे अप क्र. २१७/२०१९ कलम ३५४ (अ)(१) भादवी सहक. १२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक १६/०३/२०१९ रोजी यातील फिर्यादी /पिडीत कम्प्युटर क्लासेस करीता गेली असता यातील आरोपी राकेश उमाकांत मर्जिवे, वय ४३ वर्षे, रा रामाळेश्वर वार्ड, रामटेक जि. नागपुर याने क्लास मध्ये फिर्यादी/पिडीतेला अश्लिल स्पर्श करून तिचा विनयभंग केला.

**प्रथम तपासी अधिकारी श्रीमती वर्षा मते, सहा पोलीस निरीक्षक, नेम पोलीस स्टेशन रामटेक यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक १२/१०/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं ११ श्री ए.ए. कुलकर्णी यांनी नमुद आरोपी नामे राकेश उमाकांत मर्जिवे यास कलम ३५४ (अ) भादवि सह कलम १० पोक्सो मध्ये दोषी ठरवुन ५ वर्ष सश्रम कारावास व ५००० /– रूपये दंड , दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती रश्मी खापर्डे आणि श्रीमती आर.आर.घाटे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. राजेश थोरात, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन रामटेक, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा निलीमा इवनाते, ब.नं २२४ , नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण ,पोहवा रोहीत मांडवगडे , ब. नं. २२९ पोलीस स्टेशन रामटेक यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

# आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक १२/१०/२०२६ रोजी नवरात्रोत्सव तसेच इतर सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण जिल्हयात विविध पोलीस स्टेशन च्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली. तसेच दहशतवादी अथवा आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी अँटी टेरर ड्रिल (Anti & Terror Drill) आणि प्रत्यक्ष रेस्क्यू ऑपरेशनचे (Rescue Operation) प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी साहित्याने सज्ज होऊन सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.**

**पोलीस स्टेशन रामटेक** :— श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांचे उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री. थोरात प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन रामटेक यांचेसह रामटेक पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी रामटेक शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांचे उपस्थितीत सहा. पोलीस निरीक्षक श्री किशोर शेरकी प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पारशिवनी यांचेसह पारशिवनी पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी पारशिवनी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन अरोली** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री सागर गोमासे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन अरोली यांच्या उपस्थितीत अरोली पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार,

दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी अरोली शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन देवलापार :—** सहा. पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन देवलापार यांनी देवलापार पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी देवलापार शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**आगामी सणोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज असून, नागरिकांनीही सणोत्सव शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.**




शॉपिंग मॉल
MAHARASHTRA POLICE


NAGPUR RURAL POLIC






भव्य जग जागरण




## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांनी घेतल्या प्रशासकीय बैठका, शांतता समिती तसेच आयोजकांच्या बैठका

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नवरात्रोत्सवाच्या तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पाश्र्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी सणोत्सवांच्या निमित्य विविध बैठका घेण्यात आल्या.**

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ११/१०/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांनी नवरात्रोत्सव व इतर सण—उत्सवांच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन उमरेड येथे शांतता कमेटी पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ११/१०/२०२६ रोजी सहा. पोलीस निरीक्षक श्री भारत लसंते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांनी नवरात्रोत्सव व इतर सण—उत्सवांच्या अनुषंगाने मौदा येथील डीजे मालक व ऑपरेटर यांची बैठक घेतली.

पोलीस स्टेशन भिवापूर :— **दिनांक १२/१०/२०२६ रोजी** सहा. पोलीस निरीक्षक श्री अजितसिंग देवरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर यांनी आगामी धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्ताने निघणाऱ्या रॅली व पूजाअर्चना कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजकांची संयुक्त बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस आयोजक समितीचे अध्यक्ष / पदाधिकारी उपस्थित होते.

**नवरात्रोत्सव शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी नागरिकांनी तसेच उत्सव मंडळांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. दुर्गा उत्सवाच्या अनुषंगाने दुर्गादेवी मंडळांना नियमानुसार आवश्यक परवानगी घेणे, डीजे व ध्वनी प्रदूषणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, तसेच जातीय सलोखा राखुन सणोत्सव साजरा करावे असे अवाहन करण्यात आले. यावेळी आयोजकांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्या असून, त्यांचे आवश्यकतेनुसार संबंधित विभागांच्या समन्वयाने निराकरण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**






पोलीस स्टेशन भिवापूर
प्रभारी अधिकारी कार्यकाळ

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाचगाव येथे सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— पोलीस निरीक्षक श्री सुमित परतेकी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कोंढाळी आणि सहा. पोलीस निरीक्षक श्री बावणकर यांनी लाखोटीया भुतडा हायस्कूल कोंढाळी येथे जनजागृती कार्यक्रम घेतला.

तसेच विदयार्थी आणि शिक्षकवृंदसह सायबर जनजागृती रॅली काढली.

**पोलीस स्टेशन वडोदा** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोदा यांनी टेमसना गावाला ग्रामभेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रमास टेमसना गावातील नागरिक उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री. विनोद जांभळे प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा यांनी गरबा उत्सव मंडळ येथे भेट देवुन देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला.

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक , तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ**

'सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा **cybercrime.gov.in** या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.




नागपूर ग्रामीण पोलीस
आपली सुरक्षा । आपला विश्वास । सदैव तत्पर
विद्यार्थी आर्थिक शोषण
सावध रहा... फसवणूक टाळा !
सोशल मिडिया जनजागृती
वापरा जबाबदारीने... रहा सुरक्षित !
वैयक्तिक माहिती (फोटो, पत्ता, फोन नंबर) सार्वजनिक शेअर करू नका.
अनओळखी व्यक्तींची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका.
संशयास्पद लिंक, APK फाईल क्लिक करू नका.
ऑनलाइन छळ, ब्लॅकमेल किंवा
अयोग्य संदेश आल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क करा.
1930
www.cybercrime.gov.in
पोलीस स्टेशन, कोंढाळी


IME OF BEING STILL.
दरिया हो या पहाड़ हो टकराना चाहिए।
जब तक न सांस टूटे जिए जाना चाहिए।।





# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, ५ लाख १० हजार रूपयांचा मूद्देमाल जप्त सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक १०/१०/२०२६ रोजी सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सावनेर पोलीसांनी माळेगाव, सावनेर येथे नाकाबंदी करत कारवाई केली असता **आरोपी १) विनोद धनराज जिभकाटे, रा. ०५ श्रीवास नगर , कोराडी नागपूर २) महेश कूमार मिरगदास बरडे, रा. कोराडी नागपूर** हे मारुती अल्टीका वाहन क्रमांक एम एच —०५/ सी एच—२८७८ सह मिळुन आले. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्यांचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण वजन ५.७८६ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती १०,५२३/— रूपये, मारुती अल्टीका वाहन क्रमांक एम एच —०५/ सी एच—२८७८ किंमती ५,००,०००/—रूपये असा एकुण ५,१०,५२३/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीतांनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने वाहतूक केली आहे. **आरोपी १) विनोद धनराज जिभकाटे, रा. ०५ श्रीवास नगर , कोराडी नागपूर २) महेश कूमार मिरगदास बरडे, रा. कोराडी नागपूर** यांचेविरूद्ध पोस्टे सावनेर येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

# अवैध हातभट्टी दारू निर्मिती विरोधात पाचगाव पोलीसांची विशेष मोहीम
# चांपा पारधी बेडा येथे कारवाई करत ३ गुन्हे नोंद
# २ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन पाचगाव :— **मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा , श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात तसेच पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांच्या नेतृत्वात** दिनांक १२/१०/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांनी चांपा पारधी बेडा शिवारात मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींविरूध्द कारवाई करत महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ३ गुन्हे नोंदविण्यात आले आहे

पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन हातभट्टी दारू निर्मितीची खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलसांनी चांपा पारधीबेडा येथे कारवाई करत घटनास्थळावरील रनिंग हातभट्टया नष्ट केल्या. **सदर तिन्ही कारवाईत एकुण ४६०० लिटर मोहाफुल सडवा, १०५ लिटर मोहाफुल गावठी दारू, प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण २,४५,५००/— रूपयांचा माल जप्त केला.**

**सदर प्रकरणी आरोपी १) श्रीचंद लालचंद पवार, रा चांपा पारधी बेडा, ता उमरेड जि नागपुर ,२) ज्ञानेश्वर उर्फ नानु लालचंद पवार, रा चांपा पारधी बेडा, ता उमरेड जि नागपुर याच्यासह एक महीला आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये प्रत्येकी ०१ असे एकुण ०३ गुन्हे नोंदविण्यात आले आहे. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला आहे.**







## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये ११ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ११/१०/२०२६ रोजी विविध पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन वडोदा** अंतर्गत आरोपी करण देवीप्रसादर कश्यप, वय ४३ वर्ष, रा. संदोहन पुर्वा, घमाइचउ, जल्लापुर कन्नौज पनवारा उत्तर प्रदेश ह.मु देवीमंदीर जवळ वडोदा ता. कामठी जि. नागपुर हा मौजा झुल्लर फाटा पानटपरीच्या मागे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कन्हान** अंतर्गत आरोपी १) अजय भाउराव पडघणे, वय ३९ वर्षे, रा. पटेल नगर, पिपरी कन्हान, ता. पारशिवनी जिल्हा नागपूर २) विदीत पंजाबराव कोमटे, वय ३० वर्षे, रा. शिव नगर कन्हान, ता. पारशिवनी जिल्हा नागपुर हे नाल्या जवळ खुल्या जागेत मौजा राय नगर कन्हान येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. आरोपी ३) सुवंश कुलदीप खंडुजे, वय २३ वर्षे, रा. शिवनगर कन्हान, ता. पारशिवनी जिल्हा नागपुर हा रेल्वे स्टेशन रोड कन्हान येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. आरोपी ४) सौरभ पंजाब वासे, वय २७ वर्ष, रा. वार्ड नं. ०३, हनुमान नगर, कन्हान, ता. पारशिवनी जि. नागपुर हा खंडेलवाल कंपनी जवळ, सत्रापुर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. आरोपी नामे ५) विशाल सुरज मेहता, वय ३३ वर्ष, रा. रायनगर कन्हान, ता. पारशिवणी, जि. नागपुर हा कन्हान नदिवरील जुना पुल कन्हान येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत आरोपी आयुश उर्फ हीमांशु गजानंद संतापे, वय २१ वर्षे, रा. वैशाली नगर, कापूस जिनींग कळमेश्वर नागपूर हा मौजा आष्टी खुर्द येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत आरोपी शांताराम फुलचंद कुमरे, वय ५० वर्ष, रा. हेटीटोला वार्ड क्र.४, त. पारशिवनी, जि. नागपूर हा मौजा हेटीटोला डोलामाई येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी १. गौरव श्रीराम भोयर, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्र. थूगाव निपानी ता. नरखेड २. प्रविण प्रकाश बडोदेकर, वय ३४ वर्ष, रा. थूगाव निपाणी, ता. नरखेड हे गुडलक बारच्या बाजुला नरखेड ते खरसोली येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत आरोपी मेहीतकूमार श्रीशंभू तिवारी, वय २४ वर्ष, रा बरनोली, ता जि. चम्पारन बिहार ह. मू बोरी हा कोयंश पानठेल्या जवळ सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## २०२४ पासुन पाहिजे आरोपींना  स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घेतले ताब्यात

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात फरार व पाहिजे आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे दाखल असलेल्या अप. क्र. २१/२०२४ कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ भादंवि या फसवणुकीच्या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी १) प्रज्वल भीमराव गायकवाड, वय २१ वर्षे, २) महिला आरोपी दोन्ही रा. सोनोली ता. काटोल ह. मु. ख्रिश्चन बंगला, मुलताई रोड, वरूड जि. अमरावती हे गुन्हा दाखल झाल्यापासुन मिळुन येत नव्हते. या विशेष मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद पाहीजे आरोपींचा शोध घेतला आहे.**

**स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील पाहीजे आरोपी १) प्रज्वल भीमराव गायकवाड, वय २१ वर्षे, २) महिला आरोपी दोन्ही रा. सोनोली ता. काटोल ह. मु. ख्रिश्चन बंगला, मुलताई रोड, वरूड जि. अमरावती यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेतले. आरोपी मिळून आल्यानंतर त्यास पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस स्टेशन काटोल यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन मौदा :—** दिनांक ११/१०/२०२६ रोजी मौदा पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता **आरोपी नामे प्रणय प्रकाश भलावी, वय १९  वर्ष, रा. सोमलवाडा, ता. लाखनी, जि. भंडारा** हा शिंगोरी शिवार येथे एक संशयित इसम पायदळ जाताना दिसून आला. पोलिसांनी त्याला थांबवून विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीची व असमाधानकारक उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावला. पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातील प्लास्टीक चुंगडीची तपासली असता, त्यामध्ये पांढऱ्या रंगाची लोखंडी तार गुंडाळलेली आढळून आली. सदर तारबाबत विचारणा करून मालकी हक्काची कागदपत्रे मागितली असता आरोपीकडे कोणतीही कागदपत्रे आढळून आली नाहीत. पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातून लोखंडी तार वजन २५ किलो किंमती १५००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या

ताब्यातून मिळून आल्याने आरोपीविरूद्ध कलम १२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०८ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ७ हजार ३५०रूपयांचा मुद्देमाल जप्त देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक ११/१०/२०२६ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा मोरफाटा दर्गा शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे देवलापार पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) तारीख अहमद फारुक शेख, वय २३ वर्ष, रा. नवाज नगर नागपुर २) साहील रज्जाक चौधरी, वय २६ वर्ष, रा. नवाज नगर नागपुर ३) गुलाम बिलाल अहेमद कादीर, वय २७ वर्ष, रा. नवाज नगर नागपुर ४) आमीन खान फिराज खान, वय २६ वर्ष, रा. नवाज नगर नागपुर ५) मोहम्मद हसीन मोहम्मद सलीम खान, वय २७ वर्ष, रा. बंदे नवाज नगर नागपुर ६) अब्दुल आमीन अब्दुल कुरेशि, वय १९ वर्ष, रा बंदे नवाज नगर नागपुर ७) जीषान ईम्तीयाज मीर्जा, वय २३ वर्ष, रा. यशोधरा नगर नागपुर ८) मोहम्मद युसुफ मोहम्मद अयुब अंसारी, वय २२ वर्ष, रा. नवाज नगर, कळमना नागपुर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ७३००/—रूपये असा एकुण ७३५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०८ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ११ हजार ६५० रूपयांचा मुद्देमाल जप्त सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ११/१०/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा पाटसांवगी शिवारातील खापा रोड रेल्वे क्रॉसीग जवळील शेतातील खुल्या सार्वजनिक जागेत पाटणसांवगी येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे सावनेर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) प्रतीश भिप्रसाद आगरे, वय ४३ वर्ष, रा. वार्ड क्र ३, पाटणसांवगी पोलीस चौकी समोर ता. सावनेर २) साधु सामजियावन कुशवाह, वय ४९ वर्ष, रा. सदभावना गेट समोर पाटणसांवगी ३) राजेश मानिक मडावी, वय ४६ वर्ष, रा. वार्ड क्र ५, पाटणसांवगी ता. सावनेर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ११,६५०/—रूपये असा एकुण ११,६५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०३ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०८ गुन्हे दाखल,

**दिनांक ११/१०/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०८ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी होमराज रामनाथ उईके, वय ४० वर्ष, रा. बोथिया पालोरा, ता. रामटेक, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे मोरेश्वर मनोहर घरत, वय ४२ वर्ष, रा. माहुली, त. पारशिवनी, जि. नागपुर

याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे कपील रमेशराव धुर्वे, वय २७ वर्षे, रा. गोधनी, ता. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे आयुश संजय गायकवाड, वय २१ वर्षे, रा. धुरखेडा, ता. उमरेड याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे सुरेश रामदास श्रीरामे, वय ५० वर्षे, रा. तास, ता. भिवापूर, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे किशोर प्रमोद गेडाम, वय ३० वर्षे, रा. बिड गनेशपूर, ता. हिंगना, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ९९०० मिली देशी दारू, ०५ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ५४३६/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला**

**जनसंपर्क अधिकारी**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**